**महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-२) संवर्गाती**

**कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी पद भरती**

**जिल्हा निवड समिती जालना**

**थेट मुलाखत (Walk-In-Intenrview)**

जालना जिल्हातील शासकिय आरोग्य संस्थामध्ये रिक्त असलेल्या महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवागट-अ (वर्ग-२) संवर्गातील तदर्थ वैद्यकिय अधिकारी गट-अ यांची जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद जालना यांचे अधिनस्त असलेल्या संस्थेतील १६ रिक्त पदे व जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय जालना यांचे अधिनस्त संस्थेतील ४ पदे असे एकुण २० पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने व तात्पुरत्या स्वरुपात अकरा महिन्याच्या कालावधीकरीता भरावयाची आहेत.

इच्छुक सर्व एम.बी.बी.एस व पदव्युत्तर/पदवीका (विशेषज्ञ) अर्हता प्राप्त उमेदवारांनी थेट मुलाखतीसाठी दिनांक१२/ १० /२०२३ रोजी सर्व विषयांचे गुणपत्रक,पदवी/पदवीका प्रमाण पत्र,वयाचा दाखला,अनुभव प्रमाण पत्र,महाराष्ट्र मेडीकल कौन्सील नोंदणी प्रमाणपत्र आणि अलीकडील पासपोर्ट साईजचे दोन फोटो व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्रासह व अर्जासोबत साक्षाकिंत छायाकिंत प्रतीच्या एका संचासह सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यत नोंदणी व अर्जाची छाननी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालय,जालना येथे उपस्थित रहावे त्यानतंर सकाळी १२.०० पासुन छाननी केलेल्या अर्जामधील पात्र उमेदवारांचीप्रत्यक्ष थेट मुलाखत (Walk-In-Intenrview) घेण्यात येईल.उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

अ) आदिवासी व दुर्गम भागात काम करणारे एम.बी.बी.एस. अर्हताधारकाना दरमहा रु.८०,०००व इतर भागासाठी त्यांना मासीक रु.७५,००० हजार व पदयुत्तर/पदवीका अर्हताधारक यांना अदिवासी व दुर्गम भागात काम अर्हता धारकांना दरमहा रुपये ९०,०००/- व इतर भागासाठी दरमहा रुपये ८५,००० हजार इतकी एकत्रीक ठोक रक्कम अदा करण्यांत येईल.

ब) सदर निवड प्रक्रियामध्ये पदे ऐनवेळी कमी व जास्त करण्यांचे तसेच निवड प्रक्रीया राबविण्याच्या पध्दतीचे पुर्ण अधिकार निवडसमीतीचे राहातील व या बाबत कसलीही तक्रार करता येणार नाही.

सदर जाहिरात www.jalna.nic.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन, मुलाखतीस अर्ज करण्यासाठी अर्ज नमुना उपलब्ध असेल.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हा शल्य चिकित्सक, जालना

अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, जालना